## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०९/२०१७

**१) किटक नाशक औषध प्राशन करुन औषधोउपचारा दरम्यान तरुणाचा मृत्यु . :–**

दिनांक ०५/०९/२०१७ चे १८.०० वा. पुर्वी यातील मृतक चेतन अरुण वरठे वय २३ वर्ष, रा आंनद नगर ग्रा. पं. कारधा हा त्याचे राहते घरी कोणतेरी विषारी किटक नाशक औषध प्राशन करुन प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता डॉक्टर चौधरी खाजगी दवाखाना भंडारा येथे नेले व उपचार करुन पुढील उपचारा करीता तेथुन रेफर झाल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे वार्ड क्र. २५ मध्ये भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक ०८/०९/२०१७ चे ०४.०० वा. मरण पावल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. दाखल असुन पोना. टेभुर्णे यांनी पोलीस मेडीकल नागपुर येथुन मर्गची डायरी घेवुन पोस्टेला परत येवुन पेश केल्याने पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२) मृत अवस्थेत इसम मिळुन आल्याने मर्ग नोंद . :–**

दिनांक १२/०९/२०१७ चे १४.०० ते १३/०९/२०१७ चे ०८.०० वा. यातील फिर्यादी चंद्रशेखर सदाराम मेंढे वय २२ वर्ष, रा. कनेरी याने मृतक सदाराम झिंबल मेंढे वय ५० वर्ष, रा. कनेरी यास दिनांक १२/०९/२०१७ ला दुपारी १४.०० वा. दरम्यान गोंडउमरी रेल्वे स्टेशनवर सोडुन दिले व दिनांक १३/०९/२०१७ ला ०८.०० वा. दरम्यान मृतक हा मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) स्वत:चे अस्तित्व लपवुन लोखंडी रॉड बाळगुन मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०९/२०१७ चे ०१.०० वा दर. यातील फिर्यादी हे रात्रगस्त चेकींग व पेट्रोलींग करत असतांनी आरोपी हा मुकेश कांबळे यांचे डेअरी जवळ स्वत:चे अस्तित्व लपवुन सोबत पात्यासारखा लोखंडी रॉड बाळगुन संशयीतरित्या वावरतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. कांरडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १२२ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गभणे पो.स्टे वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १३/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४, तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.